Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

# विद्यार्थी विकास विभाग

**Dr. P. T. Gaikwad**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/२४ दि. २१/०५/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय:— सन २०२४—२०२५ या शैक्षणिक वर्षाचे युवक महोत्सव शुल्क पाठविणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, सन २०२४—२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी आपल्या महाविद्यालयात/अधिविभागात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रति विद्यार्थी रू. ८०/—इतके युवा महोत्सव शुल्क घेण्यात यावे. सदर जमा रक्कमेतून **प्रति विद्यार्थी रू. ४८/— प्रमाणे जमा होणारी रक्कम अंदाजपत्रकीय शिर्षक A.48 R.2 या खाती दि. ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी** व रू. ३२/— प्रमाणे जमा होणारी रक्कम आपल्या महाविद्यालयाच्या युवा महोत्सव खर्चासाठी ठेवून घेण्यात यावी. ही विनंती. तसेच भरलेल्या निधीची पावती या कार्यालयास त्वरीत जमा करण्यात यावी. सदर शुल्कामध्ये प्रतीवर्षी रु. ५/— प्रमाणे वाढ होत असल्यामुळे यावर्षी सदर फि प्रती विद्यार्थी रु. ८०/— इतकी झाली आहे व त्यामधील **६०% रक्कम रु. ४८/— विद्यापीठामध्ये जमा करावयाची आहे** व **उर्वरीत रक्कम रु. ३२/— आपल्या महाविद्यालयामार्फत युवा महोत्सवामध्ये सहभागी होणा—या विद्यार्थ्यांच्या खर्चासाठी वापरावयाची आहे. महाविद्यालयाकडे उर्वरीत सदर रक्कम इतर कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाही. त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे व युवा महोत्सव खर्चासाठी सदरचा निधी वापरण्यात यावा. याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सदर निधी भरणे प्रत्येक महाविद्यालयास अनिवार्य आहे.**

तसेच बऱ्याच महाविद्यालयामार्फत संपूर्ण प्रवेशित विद्यार्थ्यांचा निधी भरला जात नाही. विद्यापीठामध्ये प्रती विद्यार्थी भरलेली रक्कम व महाविद्यालयामार्फत ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) या पोर्टलवर नमुद केलेली विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) च्या पोर्टलवर नमुद केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार सदर निधी जमा करावयाचा आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
21/5/24
संचालक
विद्यार्थी विकास